सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वयेदाखल झालेली तक्रार**

## रामाआ-तक्रार क्र. बीएम- ६५८/२०१८

**तक्रारकर्ता श्री. इजहारुल हसन सिध्दीकी**
**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, (उपजिल्हाधिकारी कक्ष),
नवीन प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, (उपजिल्हाधिकारी कक्ष),
नवीन प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २०.०६.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित(ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि.१३.०६.२०२४ रोजी नोटीस प्राप्त.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी.अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००२८३८ ते २९०७ एकुण ७० प्रकरणी आयोगाने दि. २७.०७.२०१८ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले होते :-

"आयोग, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (८) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना असे निर्देश देत आहे की, त्यांनी या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी गठीत करून, या प्रकरणी गहाळ झालेल्या अभिलेखाविषयी जबाबदारी निश्चित करावी व जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २० (२) अन्वये विभागीय कार्यवाही व महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अंतर्गत फौजदारी गुन्हा नोंदवून पुढील कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्यांनी दिनांक ३०.०९.२०१८ रोजी आयोगासमोर त्यांच्या प्रतिनिधींमार्फत सादर करावा. या आदेशासह उक्त ७० अपिले मान्य करून निकाली काढण्यात येत आहेत"

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांनी तक्रार क्र. ६५८/२०१८ दाखल केलेली असून सदर तक्रार अर्जावर आज दि. २०.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

आजच्या सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

..२/-

राज्य माहिती आयोगाने दि. २७.०७.२०१८ रोजी ७० द्वितीय अपिलांवर सुनावणी घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देशित केले होते की, त्यांनी या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी गठीत करून, या प्रकरणी गहाळ झालेल्या अभिलेखाविषयी जबाबदारी निश्चित करावी व जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २० (२) अन्वये विभागीय कार्यवाही व महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अंतर्गत फौजदारी गुन्हा नोंदवून पुढील कार्यवाही करावी.

तक्रारकर्त्याने दिनांक ११.१०.२०१८ रोजीच्या तक्रार अर्जान्वये आयोगाकडे तक्रार केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणी कोणतीही कारवाई केलेली नाही.

तक्रार अर्जावरील सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचा अहवाल दिनांक १९ जून, २०२४ व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांचा अहवाल दिनांक २०.०६.२०२४ आयोगास सादर केला. तो अभिलेखावर घेण्यात आला. त्यांनी आतापर्यंत आयोगाच्य निर्देशाप्रमाणे केलेली कार्यवाही आयोगासमोर विशद केली. त्यांनी निवेदनात असे नमूद केले की, आयोगाचे आदेशाप्रमाणे ०३ अधिकाऱ्यांची उच्च स्तरीय चौकशी समिती स्थापन केलेली होती. तसेच प्राधिकरणातील २८ कर्मचाऱ्यांचे पथक निर्माण करण्यात आले होते व अभिलेखाचा शोध घेण्यात आला होता. पथकामार्फत शोध घेताना अर्जदार यांना हवे असलेले काही अभिलेख मिळून आले व काही अभिलेखांची माहिती अपिलार्थी यांना पुरविण्यात आली आहे.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. सबब आयोगपुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

**मुंबई**
**दिनांक : २५.०६.२०२४**

26-6-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**